सन २०१७-१८ करीता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत मंजूर डेटा अँनालिटीक्स आणि प्रकल्प व्यवस्थापन केंद्र प्रकल्पाच्या मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः केंद्रीय-२०१७/प्र.क्र.८६/का-१९
मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: २५/०१/२०१८

<u>वाचा-</u>

१. जनजाती कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०५/२०१७-TSP, दि.३०/०५/२०१७
२. शासन निर्णय क्रमांकः केंद्रिय-२०१७/प्र.क्र.४५/का.-१९, दि. १९/०८/२०१७

<u>प्रस्तावना -</u>

विशेष केंद्रीय सहाय्य योजनेअंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता केंद्र शासनाने रु. १२८१०.३८ लक्ष निधीच्या एकुण २८ प्रस्तावांना वाचा क्र. १ वरील पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे. Setting up of Data Analytics and Project Management Centre for TSP Planning and Budgeting या प्रकल्पाकरिता केंद्रपुरस्कृत योजनेंतर्गत व ई-गव्हर्नन्ससाठी राज्य योजनेत निधी उपलब्ध आहे. आदिवासी विकास विभागामार्फत राज्यात आदिवासी कल्याणाच्या विविध योजना राबविल्या जातात व सदरच्या योजना इतर विभागामार्फतदेखील राबविल्या जातात. या योजना राबविताना सदर योजनांची सांख्यिकी माहिती व संगणीकृत विश्लेषण करणे गरजेचे असून यासाठी विभागाकडे कोणतीही तांत्रिक प्रणाली व मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने डेटा अँनालिटीक्स आणि प्रकल्प व्यवस्थापन केंद्र (Data Analytics and Project Management Centre for TSP planning) आवश्यक आहे. सदर प्रकल्प राबविल्यास या विभागाशी संबंधित राबविण्यात येणाऱ्या इतर विभागाच्या सर्व योजनांची माहिती संकलित व विश्लेषण करुन एकत्रितरित्या उपलब्ध होईल. एकत्रित माहिती संकलित स्वरुपात उपलब्ध झाल्यास आदिवासी विकास विभागामार्फत विविध योजना राबविण्यासाठी इतर विभागास देण्यात आलेल्या निधीचे मुल्यमापन करणे व योग्य नियोजन करणे शक्य होईल .त्यानुषंगाने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांच्या अंतर्गत सनियंत्रण व मुल्यमापन कक्ष ,मुंबई येथे स्थापन करण्यात आलेला आहे. पुणे विद्यापीठांतर्गत तयार करण्यात येणारे डेटा अँनालिटीक्स आणि प्रकल्प व्यवस्थापन केंद्र कार्यकारी कक्ष हा सनियंत्रण व मुल्यमापन कक्ष ,मुंबई या अंतर्गत कार्यान्वित करण्यात येईल. सबब, वाचा क्र. २ वरील शासन निर्णयान्वये वितरीत निधीतून डेटा अँनालिटीक्स आणि प्रकल्प व्यवस्थापन केंद्र (Data Analytics and Project Management Centre for TSP Planning and Budgeting) प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनांना मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

उपरोक्त पार्श्वभूमीच्या अनुषंगाने आदिवासी विकास विभागाच्या आदिवासी उपयोजना नियोजन व अर्थसंकल्प विषयक कामासाठी सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांचे तंत्रज्ञान विभागाच्या अधिनस्त डेटा अँनालिटीक्स आणि प्रकल्प व्यवस्थापन केंद्र (Data Analytics and Project Management Centre for TSP Planning and Budgeting)स्थापन करण्यास व एकुण रु.८५५.१६ लक्ष किंमतीच्या प्रकल्पास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रकल्प अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सूचना परिशिष्ट-१ प्रमाणे राहतील.

२. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांच्या अंतर्गत सनियंत्रण व मुल्यमापन कक्ष ,मुंबई येथे स्थापन करण्यात आलेला आहे. या कक्षा अंतर्गत डेटा अँनालिटीक्स आणि प्रकल्प व्यवस्थापन केंद्राचा एक कार्यकारी कक्ष कार्यान्वित करण्यात येईल.

३. सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांचे तंत्रज्ञान विभागाच्या अधिनस्त डेटा अँनालिटीक्स आणि प्रकल्प व्यवस्थापन केंद्र (Data Analytics and Project Management Centre for TSP Planning and Budgeting) यास “तरंग” असे नामकरण करण्यात येत आहे.

४. सदर मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२५१११००१०४२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ajitsingh R Rajput

Digitally signed by Ajitsingh R Rajput
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=TDD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a614ce75be611413980d3efebe7cde81ad571ab119e8360b7b526b5159edd099, serialNumber=32168d31c7d800af039db3657f6a01d233033f3f7c16b7ca135b2c868025eb3e, cn=Ajitsingh R Rajput
Date: 2018.01.25 11:15:08 +05'30'

(अ.रा.राजपूत)
कार्यासन अधिकारी

प्रत,

१. मा.मंत्री आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
२. मा.राज्यमंत्री आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव,आदिवासी विकास,मंत्रालय,मुंबई
४. आयुक्त,आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,नाशिक.
५. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
६. सर्व सहसचिव/उपसचिव ,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
७. प्रो. विलास गायकर, कुलगुरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर टेक्निकल युनिवर्सिटी, लोणेरे
८. डॉ.आदित्य अभ्यंकर, अधिष्ठाता, तांत्रिक विभाग, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे
९. संबंधित अधिकारी
१०. संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
११. निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

विशेष केंद्रीय सहाय्य योजना-सन २०१७-१८

परिशिष्ट क्र.१

१	प्रकल्पाचे नांव -	डेटा अॅनालिटीक्स आणि प्रकल्प व्यवस्थापन केंद्र (तरंग) (Data Analytics and Project Management Centre for TSP Planning and Budgeting)
२	प्रकल्पाचे प्रस्तावित लाभ क्षेत्र	संपूर्ण महाराष्ट्र राज्य
३	वित्तीय तरतूद	सन २०१७-१८ करीता विशेष केंद्रीय सहाय्य योजने अंतर्गत मंजूर रु.३६५.०० लक्ष व ई-गव्हर्नन्स साठी राज्य योजनेत उपलब्ध असलेल्या निधीतून रु.४९०.१६ लक्ष अशाप्रकारे एकुण रु.८५५.१६ लक्ष निधी सदर प्रकल्पाकरीता उपलब्ध करून देण्यात येईल.
४	प्रकल्पाचा खर्च	(तक्ता खाली)

अ.क्र.	बाब	एकूण खर्च (रु. लाखात)
Non-Recurring Expenditure		
1	Space planning Design	50.00
2	Civil Engineering Infrastructure	15.00
3	Mechanical Engineering Infrastructure	4.00
4	Electrical Engineering Infrastructure	15.00
5	Technology Infrastructure	350.00
6	Communication Lines	5.00
7	Software's	200.00
8	Data Centre Monitoring and Support	20.00
9	Analytics Centre Equipment’s	5.00
	Total	**664.00**
Recurring Expenditure (per Year)		
1	Human Resources	20.72
2	Consumables	12.00
3	Contingencies	05.00
4	Travel	11.00
5	Other Expenditure	05.00
6	Overhead	10.00
	Total	**63.72**
Recurring Expenditure (For 3 Years) =63.72 x 3		**191.16**

५	प्रकल्प राबविणारी यंत्रणा	तंत्रज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे
६	नियंत्रक अधिकारी	आयुक्त,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे
७	प्रकल्पाचा उद्देश	१) आदिवासी विकास विभागामार्फत राज्यात आदिवासी कल्याणाच्या विविध योजना राबविल्या जातात व सदरच्या योजना इतर विभागामार्फतही राबविल्या जातात. या योजना राबविताना या विभागाकडे तसेच इतर विभागांकडे असलेली माहिती ही विविध प्रकारात उपलब्ध असून ती संगणकीकृत आहे.

		२. सदर माहिती उपलब्ध करुन घेण्यास विभागाकडे कोणतीही तांत्रिक प्रणाली व मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने Data Analytics and Project Management Centre for TSP planning and budgeting हा प्रकल्प आवश्यक आहे . ३. सदर प्रकल्प राबविल्यास या विभागाशी संबंधित राबविण्यात येणाऱ्या इतर विभागाच्या सर्व योजनांची माहिती संकलित व विश्लेषण करुन एकत्रितरित्या उपलब्ध होईल. एकत्रित माहिती संकलित स्वरुपात उपलब्ध झाल्यास आदिवासी विकास विभागामार्फत विविध योजना राबविण्यासाठी इतर विभागास देण्यात आलेल्या निधीचे मुल्यमापन करणे व योग्य नियोजन करणे शक्य होईल. ४. सदरचा प्रकल्प राबविल्यास आदिवासी विकास विभागासह या विभागांतर्गत असलेले आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे व आदिवासी विकास महामंडळ, नाशिक या कार्यालयांना देखील तांत्रिक लाभ होईल.
८	**प्रकल्प अंमलबजावणीची कार्यपद्धती**	आदिवासी विकास विभाग व सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांच्या मधील Setting up of Data Analytics and Project Management Centre for TSP planning and budgeting साठी असलेल्या सामंजस्य कराराप्रमाणे हा प्रकल्प राबविण्यात येईल.
९	निधी वितरणाचे टप्पे	अंमलबजावणी संस्थेस म्हणजेच तंत्रज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांना प्रकल्प अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे निधी वर्ग करण्यात यावा. i) प्रथम वर्ष - TSP planning and budgeting साठी Data Analytics and Project Management Centre उभारणीसाठी रू.६६४.०० लक्ष व अनावर्ती खर्च रू.६३.७२ लक्ष असे एकूण ७२७.७२ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात यावा. सदर निधी सन २०१७-१८ करीता विशेष केंद्रीय सहाय्य योजने अंतर्गत मंजूर रु.३६५.०० लक्ष व ई-गव्हर्नन्समधून देण्यात येणा-या रू.४६५.०० लक्ष राज्य योजनेतील निधीमधून रु.३६२.७५ लक्ष निधीतून देण्यात येईल. ii) द्वितीय व तृतीय वर्षासाठी प्रत्येकी रू.६३.७२ लक्ष इतका आवर्ती खर्च हा राज्य योजनेत उपलब्ध असलेल्या निधीतून देण्यात यावा.
१०	**प्रकल्प राबविण्याच्या अटी व शर्ती**	➢ Data Analytics and Project Management Centre हा प्रकल्प सुरू करणे व प्रकल्पाच्या देखभालीची संपूर्ण जबाबदारी तंत्रज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांची राहील. ➢ हा प्रकल्प एक वर्षाच्या कालमर्यादेत पूर्ण क्षमतेसह सुरु करणे व प्रत्येक ३ महिन्यांनी झालेल्या प्रगतीचा अहवाल सादर करणे माहिती व तंत्रज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांना बंधनकारक राहील . ➢ प्रकल्पाच्या सर्वसाधारण अटी व शर्ती आदिवासी विकास विभाग व तंत्रज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्यामधील सामंजस्य कराराप्रमाणे राहतील.

११	प्रकल्पाचा कालावधी	३ वर्षे
१२	प्रकल्पाचे संनियंत्रण व मुल्यमापन पर्यवेक्षण	➢ सदर प्रकल्प राबविण्यासाठी खालीलप्रमाणे सल्लागार समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समिती प्रकल्पाचे मुल्यमापन व सनियंत्रण करण्याचे कार्य करेल. १. प्रो. विलास गायकर , कुलगुरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर टेक्निकल युनिवर्सिटी, लोणेरे २. डॉ.आदित्य अभ्यंकर, अधिष्ठाता, तंत्रज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ३. NIC प्रतिनिधी पुणे ४. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे ५. संबंधित उपसचिव,आदिवासी विकास विभाग,महाराष्ट्र शासन ६. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील २ तज्ञ प्रकल्प अधिकारी ७. मंत्रालय सल्लागार (e-governance) ८. मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो), पुणे विद्यापीठ ९. प्रकल्पात सहभागी पक्षांच्या सहमतीने निवडलेले तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ. - सदर समिती दर ३ महिन्यांनी आढावा बैठक घेऊन प्रकल्पाची प्रगती व अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शन व चर्चा करील. तसेच सदर प्रकल्पास भविष्यात आवश्यक संसाधन पुरविणेबद्दल निर्णय घेईल.